# कार्यालय
# नगरपंचायत कांद्री(कन्हान)
तहसील-पारशिवनी, जिल्हा-नागपूर ४४१४०१

Email-nagrpanchaytkandri@gmail.com

आज़ादी का अमृत महोत्सव

क्रमांक/नपं.कांद्री(कन्हान)/अग्नि.वि/ 884/2025 दिनांक: 6/03/2025

प्रती,

एलम वच्छलागोपी फाऊंडेशन,
वच्छलागोपी पब्लिक स्कूल,
पाटील नगर कांद्री(कन्हान)

विषय :– वच्छलागोपी पब्लिक स्कूल च्या इमारतीचे **नियमित** अग्निसुरक्षा नाहरकत प्रमाण पत्र चे **नुतणिकरण** देणेबाबत.

संदर्भ :– 1) आपला अर्ज आवक क्र. 397 दिनांक 05/02/2025.
2) आपण सादर केलेले ब्रदर्स फायर सिस्टीम्स इंडिया प्रायव्हेट लि. नागपूर यांचे B Form License No : MFS/LA/RF-305/RD-287 Date 03/02/2025 नुसार.

वरील विषयांकित संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने आपणा द्वारे शाळेच्या इमारतीस ब्रदर्स फायर सिस्टीम्स इंडिया प्रायव्हेट लि. नागपूर यांचे अंकेक्षण अहवाल B-Form नुसार अग्निशमन सुरक्षेची सर्व साधने लावलेली आहे. व संदर्भीय क्रमांक (1) नुसार अतिरिक्त अग्निशमन अधिकारी यांनी दिनांक 25/02/2025 रोजी दुपारी 12.30 वाजता आपले इमारतीचे निरिक्षण केले असुन अग्निशमन सुरक्षा संबंधीत साहित्य उपलब्ध असल्याने आपणास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन **नियमित** ना हरकत प्रमाणपत्र चे **नुतणिकरण** देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

1) राष्ट्रीय इमारत महिला 2016 नाग नुसार इमारतीचे बांधकाम असणे आवश्यक आहे.
2) महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 नियम व कायद्याचे व राष्ट्रीय इमारत संहिता 2018 भाग 4 नुसार कायद्याने काटेकोरपणे पालन करावे नसल्यास नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
3) अधिकृत अभिकरणाकडून अधिसुरक्षा परीक्षण केल्यानंतर ग्राम परिशिष्ट–एक व परिशिष्ट–दोन मध्ये नमूद त्रुटयाचे निराकरण उपरोक्त विहित कालावधीत पूर्ण कराणे व त्याबाबतचे पत्र कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.
4) विविध प्रकारचे फायर फायटिंग उपकरण प्रस्थापित करणे आवश्यक आहे. उदा. $CO_2$, DCP Extinguisher, Fire Buckets, Automatic Alarm System, Smoke Detector, Hose-reel, Hydrant etc.
5) सर्व प्रकारचे प्रस्थापित फायरफायटिंग उपकरण उत्कृष्ट दर्जाचे असावे व आपत्कालीन परिस्थितीत सहज उपलब्ध असावे.
6) होजरीलची यंत्रणा इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर असणे आवश्यक आहे.
7) पाणी साठण्याची गच्चीवरील टाकी कमीत कमी 25,000 लिटर क्षमतेची टाकी आग विझवण्याकरिता उपलब्ध व नेहमी भरलेली असावी.
8) कमीत कमी प्रत्येक मजल्यावर एक यार्ड नळखांब असणे आवश्यक आहे.
9) इमारतीच्या परिसरामध्ये स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था असणे आवश्यक आहे.
10) आपत्कालीन दूरध्वनी क्र. असणारा बोर्ड दर्शनीय भागात लावणे तसेच अग्निसुरक्षा चिन्हे असलेले बोर्ड अंधारात सुध्दा दिसणारे इमारतीच्या आतील भागात लावणे आवश्यक आहे. “DANGER’’, ‘’NO-SMOKING’’, “FIRE EXIT”, “FIRE ESCAPE”, “EXTINGUISHER”, EVACUATION PLAN”, FLOOR PLAN”

12) राष्ट्रीय इमारत संहित 2016 भाग 8 येथील कलम 4.6.2 नुसार 15 मीटर व त्यापेक्षा उंच तसेच 1500 चौरस मीटरच्या परिसर असलेल्या इमारतीत किमान दोन जीने (Staircase) असणे आवश्यक आहे.
13) डिझेल व इलेक्ट्रिकवर चालणारे पाणी पंप आवश्यक आहे.
14) अग्नि–प्रतिरोधक दरवाजे तसेच आपत्कालीन गमन मार्ग (FIRE EXIT) व त्यास "PUSH BAR TO OPEN" दरवाजे असणे आवश्यक आहे.
15) इमारत मध्ये बदल झाल्यास त्याबाबतची लेखी सूचना अग्निशमन विभागाला देणे अनिवार्य राहील.
16) लिफ्ट मध्ये क्षमतेपेक्षा जास्त व अपात्कालीन परिस्थितीत लिफ्टचा उपभोक घेणे वर्जित राहील. लिफ्ट चालविण्याचा परवाना (LICENCE TO WORK LIFT) सादर करावा लागेल.
17) लिफ्टला चालविण्याचा मुख्य विद्युत पुरवठा खंडित झाल्यास अतिरिक्त विद्युत व्यवस्था व तात्काळ डिझेल जनरेटरची स्वयंचलित व्यवस्था आणे आवश्यक आहे.
18) सदर मिळकती मध्ये अनाधिकृत बांधकाम आढळल्यास सदर बाबतचे प्रमाणपत्र रद्य समजण्यात येईल.
19) अग्निशमनाचे साहित्य वापरण्याचे प्रशिक्षण आपल्या कर्मचाऱ्यांना नियमितपणे वेळोवेळी द्यावे.
20) शासनाकडुन मिळालेल्या परवान्याचे नियमित नूतनीकरण प्रत्येक वर्षात करावे.
21) वरील बाबीची पूर्तता करुन महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम 2006 (2009) नियम व कायद्यानुसार फॉर्म A सादर करणे तसेच फॉर्म B प्रत्येक वर्षातील जानेवारी व जुलै महिन्यात सादर करणे आवश्यक आहे.
22) शासनाने वेळोवेळी घालून दिलेल्या शर्ती व अटीचे काटेकोरपणे पालन करावे.

सदर देण्यात येत असलेले प्रमाणपत्र तात्पुरते स्वरुपाचे असुन या कामाव्यतरिक्त इतर कोणतेही शासकीय कामात याचा वापर करता येणार नाही. तसे आढळून आल्यास सदर बाबतचे प्रमाणपत्र रद्य समजण्यात यावे.

**करिता वरील नमुद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून तात्पुरते स्वरुपाचे आग प्रतिबंधक ना–हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे. विहित कालावधीत आवश्यक पूर्तता पूर्ण न झाल्यास सदर बाबतचे प्रमाणपत्र रद्य समजण्यात येईल.**

टीप :– सदर प्रमाणपत्र हे दिनांक 31 मार्च 2026 पर्यंत विधीग्राहय राहील.

कार्यालय नगर पंचायत कांद्री (कन्हान)

**मुख्याधिकारी**
**नगरपंचायत कांद्री(कन्हान)**

मुख्याधिकारी
नगर पंचायत कांद्री (कन्हान),